जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ७१९ दिनांक - २३/०९/२०२३**

हडपसर पोलीस स्टेशन,पुणे शहर

**पुणे शहरात गणेशोत्सव दरम्यान पश्चिम बंगाल,उत्तरप्रदेश आणि झारखंड राज्यातुन येवून मोबाईल चोरी करणा-या ५ जणांच्या टोळीस केले जेरबंद ३,८०,०००/- रू.कि.चे २० मोबाईल हॅन्डसेट जप्त**

पुणे शहरात सध्या गणेशोत्सव साजरा होत असून हडपसर पोलीस ठाणे हद्दीत भाजी मंडई, गाडीतळ परिसरात लोकांची सामान खरेदी साठी लगबग चालु असते. याच दरम्यान मोबाईल चोरीच्या घटनांमध्ये वाढ झाल्याने वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री रविंद्र शेळके यांनी तपास पथक अधिकारी / अंमलदार यांना त्याबाबत काही सुचना दिल्या होत्या.

त्याप्रमाणे तपास पथक अधिकारी सपोनि विजयकुमार शिंदे, पोउपनिरी अविनाश शिंदे, व पोलीस अंमलदार असे पोलीस मित्र यांचे सोबत गाडीतळ बस स्टॉप, हडपसर भाजी मंडई भागात पेट्रोलींग करीत असताना तपास पथकातील **अंमलदार प्रशांत टोणपे व अजित मदने** यांना गोपनीय माहीती मिळाली की, मोबाईल चोरी करणारे संशयीत हे गांधी चौक येथे थांबले आहेत.

तपास पथकाने सापळा रचून आरोपी नामे १) **कौशल मुन्ना रावत वय २१ वर्षे रा. बंगलाबाजार, चारबाग रेल्वेस्टेशन जवळ, लखनौ राज्य उत्तरप्रदेश २) मंतोषसिंग श्रवण सिंह वय २२ वर्षे रा. बाबुपुर, तिनपहार रेल्वेस्टेशन जवळ जिल्हा सायरगंज राज्य झारखंड ३) जोगेश्वर कुमार रतन महतो ऊर्फ नोनीया वय ३० वर्षे रा. बाबुपुर, तिनपहार रेल्वेस्टेशन जवळ जिल्हा सायरगंज राज्य झारखंड ४) सुरज रामलाल महातो वय ३० वर्षे रा. बाबुपुर, तिनपहार रेल्वेस्टेशन जवळ जिल्हा सायरगंज राज्य झारखंड ५) एक विधीसंघर्षित बालक रा. पंडेश्वर आसनौर जिल्हा वर्धमान पश्चिम बंगाल** यांना ताब्यात घेवून त्यांचेकडे अधिक तपास करता त्यांचे ताब्यात २० मोबाईल हॅन्डसेट हे मिळून आले आहे.

पुणे शहरात गणेशोत्सवा दरम्यान अधिक गर्दी असते व त्यादरम्यान मोबाईल चोरी करण्याकरीता ते १५ सप्टेंबर रोजी लखनौ स्टेशन येथे एकत्र भेटले व त्यानंतर दिनांक २०/०९/२०२३ रोजी पुणे शहर स्टेशन येथे रेल्वेने आले. त्यानंतर त्यांनी पुणे शहरात हडपसर, बंडगार्डन, स्वारगेट, फरासखाना पोलीस स्टेशन हद्दीत गर्दीचा फायदा घेवून मोबाईल चोरी केले असल्याचे सांगितले.

हडपसर तपास पथकाने आरोपींकडून आज रोजी पर्यंत हडपसर पोलीस ठाणेकडील ०४ गुन्हे उघडकीस केले आहेत. आरोपींताकडून किं.रू ३,८०,०००/- चे २० मोबाईल हॅन्डसेट जप्त करण्यात आले आहेत. गुन्ह्याचा पुढील तपास अंकुश बनसुडे पोलीस नाईक हडपसर पोलीस ठाणे हे करीत आहेत.

सदरची कामगिरी ही मा.अप्पर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक विभाग,पुणे श्री.रंजनकुमार शर्मा व मा.पोलीस उप आयुक्त,परिमंडळ ५,पुणे श्री.विक्रांत देशमुख यांचे मागदर्शनाखाली मा.सहाय्यक पोलीस आयुक्त,हडपसर विभाग पुणे, श्रीमती अश्विनी राख,वरिष्ठ पोलीस निरीक्षक हडपसर पोलीस स्टेशन,श्री. रविंद्र शेळके पोलीस निरी.(गुन्हे)श्री. विश्वास डगळे,श्री.संदीप शिवले यांचे सुचनाप्रमाणे तपास पथकाचे सहा.पोलीस निरीक्षक, विजयकुमार शिंदे, पोलीस उप निरीक्षक अविनाश शिंदे, पोलीस अंमलदार, सुशील लोणकर, संदीप राठोड, समीर पांडुळे, सचिन जाधव, शाहीद शेख, प्रशांत दुधाळ, निखील पवार, अतुल पंधरकर, भगवान हंबर्डे, अनिरूध्द सोनवणे, सचिन गोरखे, प्रशांत टोणपे, अजित मदने, चंद्रकांत रेजीतवाड, मनोज सुरवसे, अमोल दणके, कुंडलीक केसकर, रशिद शेख, पोलीस मित्र अविनाश ढगे, शुभम खाडे, कावेरी फाळके, पुनम काळे, प्रतिक माने यांचे पथकाने करुन प्रशंसनीय कामगिरी केली आहे.

